आदरांजली

मुक्ता मनोहर

# किशोरीताई

*विभास आणि विभास*

सोमवारची मध्यरात्र उलटून गेली होती. त्या अपरात्री एका मित्राचा मिस-कॉल बघितला आणि मी त्याला लगेच फोन केला. किशोरी आमोणकर गेल्या...त्याचा आवाज. मी ताडकन उठले. क्षणात माझं भावविश्व उन्मळून पडलं. मी काही क्षण सुन्न बसले मग एबीपी माझावर त्यांच्या त्या धक्कादायक निधनाच्या बातम्या बघत बसले.

काही महिन्यांपूर्वी माझ्या ज्येष्ठ मैत्रिण सुलभाताई ब्रह्मे, यांच्याही निधनाची अशीच अचानक बातमी आली होती आणि त्याही वेळेस माझं भावविश्व असंच उन्मळून पडलं होतं. सुलभाताईंइतका तर नाहीच नाही, पण माझा किशोरीताईंशी व्यक्तिगत पातळीवरचा मुळीच परिचय नव्हता. ओळख झाली होती. जवळून बघण्याची, अगदी दोनचार वाक्यं बोलण्याची संधी मिळाली होती एवढंच. एक नक्की किशोरीताईंच्या सानिध्यात दीर्घ काळ असणाऱ्या संगीत क्षेत्रातल्या अनेक दिग्गजांशी माझे खूप जवळचे, काही घट्ट मैत्रीचे तर संबंध नक्कीच होते-आहेत. त्यामुळेच सुलभाताईंच्या जाण्याने जी अचानक पोकळी जाणवली, अगदी तशाच तितक्याच गहिऱ्या पोकळीनं मला किशोरीताईंच्या निधनाच्या बातमीनं ग्रासून टाकलं. संगितासाठी आणि विशेषतः संगीतातल्या सुरांसाठी जगणं म्हणजे काय याचा किशोरीताई या साक्षात आविष्कार होत्या. त्यांच्या निधनाच्या बातमीने मी व्याकूळ होत राहिले सतत दिवसभर..

ईमेलः muktaashok@gmail.com

काही वर्षांपासून माझ्या मनात ठाण मांडून बसलेली ती एक पहाट मला पुन्हा आठवली, ज्यामुळे मी किशोरीताईंच्या स्वरमोहिनीमध्ये पूर्ण गुरफटून गेले. अशोक मनोहर नुकतेच निधन झालेले होते. नेहमी प्रमाणेच युनियनच्या कामाचा प्रचंड ताण होता. आणि पहाटे तीनच्या सुमाराला मी किशोरीताईंचा 'विभास' नावाचा राग लावला. हे..नरहर..नारायण....यातल्या 'हे'....शब्दाच्या स्वरांवरची आलापी मी ऐकली आणि अक्षरशः माझ्या हृदयाचा थरकाप झाला. कानावर येणारा प्रत्येक स्वर  एका गूढ चैतन्याला साद घालत होता. प्रकाशाची जणू ती आराधनाच होती. आणि त्या आराधनेत, गूढ वैश्विक तेजोमय सूर्याच्या अस्तित्वाचे संपूर्ण भान होते. सुरांमध्ये एवढी ताकद असू शकते या जाणिवेने जवळ जवळ त्या दिवसभरच मी प्रचंड गूढ अस्वस्थतेत राहिले. भारावल्यासारखी.

दीर्घ काळानंतर मी चक्क शास्त्रीय गाणं गायला शिकायला लागले होते. माझ्या एका जिवाच्या मैत्रिणीच्या आग्रहामुळे. त्याचं कारण अशोकचं अचानक झालेलं निधन हेच होतं. त्या दिवशी मी किशोरीताईंच्या शिष्यांचा शोध घ्यायचा आणि जो कोणी मला गाणं शिकवायला धाडसी होकार देईल त्याच्याकडे वेळात वेळ काढून गाणं शिकायचंच असा निर्णय घेतला. सर्वात सुंदर गोष्ट ही घडली की माझी पहिलीच भेट रघुनंदन पणशीकर यांच्याशी झाली. आणि त्यांच्यामुळेच मी त्यांच्या काकू आणि प्रसिद्ध गायिका मीराताई पणशीकर यांच्यापर्यंत पोचले. मीराताई दीर्घ काळ किशोरीताईंकडे गाणं शिकलेल्या तेही अगदी पुण्याहून मुंबईला जाऊन. याशिवाय अच्युत गोडबोले, त्यांची बहिण सुलभा पिशवीकर यांच्या गाठीभेटीतूनही किशोरीताईंच्या गाण्याची आणि व्यक्तिमत्त्वाची ओळख होत गेली. पुढे म्हणजे अगदी आजपर्यंत माझी मधुवंती देव हिच्याबरोबरही मैत्री झाली. सध्या मधुवंती, तिचा मुलगा आणि सून दर शनिवार-रविवार किशोरीताईंकडे गाण्यासाठी जात असल्याचं मला माहीत होतं. या सर्वामुळे तर मी माझ्या कल्पनेत किशोरीताईंच्या अगदी जवळच जाऊन पोचले. त्यांचे राग ऐकणे, पुन्हा पुन्हा ऐकणे आणि त्या रागांचा अनुभव घेणं, हा काहीसा गूढ वाटणारा माझा प्रवास सुरू झाला, तो एकीकडे चळवळीचे, घोषणांचे काम करत.

त्यांची एखादी तरी मैफिल ऐकावी असा माझ्या मनात ध्यास होता. एका वसंतोत्सवात किशोरीताईंचं गाणं ऐकायला जायचं मी ठरवलं. जाण्याआधी मी सहजच सुलभाताईंना हे बोलले. तर त्या म्हणाल्या हे काय मला न घेताच तू जाणार? आणि मला कौतुक भरल्या आवाजात सांगत राहिल्या, अग किशोरी माझ्या फार फार आवडीची गायिका आहे. ती आणि मी सारख्याच वयाच्या असू. आमच्या कॉलेजात मोगूबाईंचं गाणं होतं. किशोरी खूपच तरुण होती, आणि मोगुबाईंना साथ करायला बसली होती. पण काही तरी कारणाने तिचा थोडा मूड गेलेला होती आणि माझ्या हे सगळं अगदी आजही डोळ्यापुढे आहे. ..मग मी आणि सुलभाताईंनी अक्षरशः कडकडणाऱ्या थंडीत किशोरीताईंचं गाणं एकलं. त्यावेळेस त्यांच्या साथीला त्यांची नात तेजश्री होती. तेजश्रीकडे बघून सुलभाताई मला म्हणाल्या किशोरीची नातही किती छान आहे ना! अगदी वेगळ्याच संवेदनांनी  सुलभाताईंबरोबर मी बांधले गेले.

त्यानंतर मला किशोरीताईंना ऐकण्याची संधी मिळाली. म्हणजे ती त्यांची मैफिल नव्हती. त्या बोलणार होत्या त्यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'स्वरार्थ रमणी' या पुस्तकावर. हे पुस्तक मला खूप आवडलेलं. त्यामुळे मला त्यांचं व्याख्यान ऐकायची प्रचंड  उत्सुकता होती. मी प्रवेश केला तेव्हा हॉल

अगदी पॅक होता. साडेतीनशे अगदी तरुण मुलामुलींनी गर्दी केलेली होती. या व्यतिरिक्त अजून दोनशे मुलामुलींना जागे अभावी खालच्या हॉलमध्ये स्क्रीनसमोर बसावं लागलं होतं. ही सगळी तरुण पिढी आयटी क्षेत्राशी आणि बऱ्याच अंशी सुखवस्तू कुटुंबातली असावी हे स्पष्ट जाणवत होतं. किशोरीताईंबद्दल उत्सुकता,आदर असं वातावरण भारावलेलं होतं.

किशोरीताईंनी बोलायला सुरुवात केली. त्या मंचावर खुर्चीवर नव्हे तर मांडी घालून बसलेल्या होत्या. अगदी ताठ. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला ऐंशी वर्षं उलटण्याचा स्पर्शही नव्हता. इतक्या त्या रसरशीत दिसत होत्या. आणि त्यांना भारतीय संगीताविषयी जे काही सांगायचं होतं ते तरुण पिढीलाच. तब्येतीच्या कारणामुळे ज्यांना मांडी घालून बसणे अवघड आहे त्यांच्यासाठीच्या खुर्च्या मागे मांडायला लावल्या आणि तरुण पिढीला समोर येऊन बसायला लावलं. त्या म्हणजे स्वर-संगीत, स्वरांच्या साकार स्वरूपाचा जणू साक्षात एक ध्यास होत्या. हा ध्यास त्यांना तरुण पिढीला उलगडून सांगायचा होता.

त्यांनी आपल्या पुस्तकाची जमलेल्यांना केवळ माहिती करून दिली नाही तर उपस्थित संगीत साधना करणाऱ्यांनी किशोरीताईंशी संवाद करावा ही त्यांची अपेक्षा होती. 'मी तुमच्याशी संवाद साधायला आले आहे, भाषण करायला नाही' असं म्हणून त्यांनी स्वरार्थ रमणीच्या मांडणीमधले काही प्रश्न उपस्थितांपुढे ठेवले. सगळीकडे शांतता पसरली. किशोरीताईंशी कसं बोलावं असं वातावरणात काही काळ दडपण राहिलंही. मात्र काही वेळानंतर तरुणाईनं ते दूर सारलं आणि चक्क मंडळी किशोरीताईंशी मोकळेपणानं बोलायलाही लागली.

किशोरीताईंनी त्यांच्या मांडणीच्या अगदी सुरुवातीलाच त्यांच्या मनातली एक काहीशी सल व्यक्त केली. अचाट सामर्थ्य असलेलं हे माझं संगीत लोकप्रिय का नाही? हा तो प्रश्न होता. या संगीताच्या सामर्थ्याचाच त्यांनी घेतलेला वेध म्हणजे 'स्वरार्थ रमणी' हा त्यांचा ग्रंथ. त्यांच्या मांडणीतून-चर्चेतून मला जे भावलं समजलं, ते हेच होतं की स्वरांची अशी एक भाषा आहे. या अतुलनीय भाषेला शब्दांची किंवा वेळ प्रसंगी ताल-तत्त्वाचीही आवश्यकता वाटत नाही. स्वर हा मुख्यतः भावनांचा वाहक असतो. विविध भावभावनांचा वाहक असणारा हा स्वर माणसाला कुठे आणि कसा सापडला? त्यांच्याच पुस्तकात याचं उत्तर मला सापडलं, ते असं-पूर्वजांनी पशुपक्ष्यांच्या आवाजाशी स्वरांचे साधर्म्य दाखविले आहे. पशुपक्षांचे आवाज किंवा त्यांचे बोलणे हे सदैव न बदलणारे असते. त्यांच्या बोलण्यात विशेष फरक नाही. कोकिळ, मोर, क्रौंच, बकरी, हत्ती इत्यादी पशूपक्षी कायम एकाच पद्धतीने बोलत असतात. तसेच ते एकमेकांपेक्षा खूपच वेगळे बोलत असतात. आणि प्रत्येक वेळेला ते त्याच आवाजात बोलत असल्याने, पुन्हा पुन्हा तसेच बोलत असल्याने सप्तकातील स्वरांचे त्यांच्याशी साधर्म्य पूर्वजांनी सांगितले आहे..... यानंतर किशोरीताईंनी सप्तकातील प्रत्येक स्वर कोणत्या पक्षाच्या आवाजाचा आहे ते मांडलं आहे, जसं चातक पक्षी ऋषभ उच्चारतो... वगैरे.(स्वरार्थरमणी पृ.क्र.६१-स्वरशक्ती)

पुस्तक वाचताना, त्यांचं भाषण एकतानाही मला हे सगळंच खूप छान अफाट आणि माणसाच्या निसर्गाच्या जवळ जाण्याच्या स्वाभाविक धडपडीचा प्रत्यय देणारं वाटलं. माणूस आणि निसर्ग यात एकीकडे द्वंद्व आहे आणि दुसरीकडे ते द्वंद्व मिटवण्याची ओढही आहे. निसर्गाशी कलेच्या माध्यमातून आणि विशेषतः संगीत कलेच्या माध्यमातून माणूस एकरूप पावण्याची जी धडपड

करतो त्यातूनच अगदी आद्य काळापासूनच्या संगीताची, प्रार्थनांची, शब्दविरहित ॐकाराची असंख्य रूपं आपल्या अनुभवाला येतात. म्हणूनच संगीतही साऱ्या विश्वाची भाषा होऊन जाते. ही संगीताची भाषाच मनुष्य आणि निसर्ग यांच्या नात्यांचं प्रतिनिधित्व करतं. इतर प्राणी पक्षी यांच्यापेक्षा वेगळा ठरलेला मनुष्य प्राणी तो निर्माण करत असलेल्या 'संस्कृती' या घटकामुळे समस्त प्राणीसृष्टीत वेगळा ठरतो.

किशोरीताईंमुळे भावभावनांचा आविष्कार विविध स्वरांतूनच प्रकट होतो हे अगदी अंतःकरणात जाऊन बसलं. त्या स्वरांबद्दल आग्रही तर होत्याच पण त्यावर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. गंमत म्हणजे इतिहासाचार्य वि. का. राजवाडेही स्वर सामर्थ्याचं वर्णन करताना याच मुद्द्यावर भर देतात. अतिरेक होऊन विकार व विचार मनात मावेनासे झाले, द्रवून उतू जाऊ लगले व साध्य साधनांद्वारा प्रदर्शित करता येईनासे झाले म्हणजे अतिशायनाच्या ज्या गायन, चित्रण, नृत्य व मूर्तिकरण ह्या कला त्यांचा आश्रय मनुष्य करतो, मनाचे द्रवून जे ऊतू जाणे त्यालाच रस म्हणतात. शृंगार, करुण, वीर, अद्भुत, हास्य, रौद्र, भयानक बिभत्स व शांत या नऊ तऱ्हांनी द्रवून मन उतू जाते व या नऊही उतांचे प्रदर्शन गान, चित्रण, नृत्य व मूर्तिकरण या चार अतिशायनांनी मनुष्य साधतो. शब्द व भाषा यांचा व गानाचा काहीएक संबंध नाही. गान हजारो शब्दांनी बोलत नाही, फक्त सप्त स्वरांनी नवरस बोलते.[१]

हा इतिहासाचार्य राजवाड्यांचा उतारा लक्षात घेतला तर किशोरीताईंच्या संगीताविषयीच्या समृद्ध जाणीवेचा प्रगल्भ प्रत्यय सतत येत राहतो. कारण त्या ते साक्षात सादरच करतात. त्यांच्या संगीताविषयीच्या अनेक साध्या अभिव्यक्तींमध्येही हे प्रत्यय येतात. जसे, त्या अनेक वेळा म्हणायच्या, मी गाण्याच्या बाबतीत गर्भ श्रीमंत आहे. मी पोटात असताना 'माई अल्लादियाँ खाँसाहेबांकडे गाणं शिकत असे, गाण्याचा रियाज करत असे.' या त्यांच्या सहज सांगण्यालाही एक छानसा संदर्भ आहे, तो असा की, माणसाला लय आणि ताल याची जाण असतेच असे जीवशास्त्राच्या अभ्यासकांनी सिद्ध केलं आहे. आईच्या पोटात गर्भ वाढतो तेव्हा आईच्या हृदयाचे ठोके त्या बाळाला सतत ऐकायला मिळतात, यातूनच ही जाणीव विकसित होते.' किशोरीताई संगीताचा वारसा सांगतात आणि माणसाच्या निसर्गाशी असणाऱ्या नात्याचीच जणू स्वरभाषेच्या रूपातून नोंद घेण्याला उद्युक्त करतात. त्यांच्या 'स्वरार्थ रमणी' या पुस्तकात अशा अनेक जाणिवांचा सप्तरंगी आविष्कार दिसतो. 'स्वर हा भावनांचा वाहक असतो' ही बाब त्यांच्या कणाकणात वास्तव्य करत होती. या भावभावनांच्या असंख्य छटांचीही त्यांना चांगलीच जाण होती. म्हणूनच अंतरा आणि अस्थाई या दोन्ही बाबत त्या विचक्षक होत्या. गरज वाटली तिथे त्यांनी स्वतःच्या बंदीशीही केल्या. मात्र 'प्रथम सुर साधे, तब अलंकार कर दिखाए' हेच त्यांच सदैव सूत्र राहिलं. त्यांनी केलेल्या बंदिशी म्हणजे तर त्यांच्या जाणकारीचा सुवर्ण कळस वाटतो.

मनात खोलवर रुजलेल्या भावनांपर्यंत पोचणं सुद्धा तसं कठीणच तर रागनाट्यात ते पकडणं आणखीनच महाकठीण. पण किशोरीताईंचा विचार तर संपूर्ण रागाला काय व्यक्त व्हायचंय हा होता. त्यावर त्यांनी झपाटून कामही केलेलं. म्हणूनच गाण्यातून गळ्याच्या कसरती करणाऱ्यांवर त्या कडाडून उठत. माध्यमावरच काय काम करत बसलात, राग भावापर्यंत कधी पोचणार? हा त्यांचा रोख होता. तसंच गाण्याची नक्कल करणंही त्यांना पसंत नव्हतं. हे त्यांचं वाटणं हाच त्यांच्या सृजनशीलतेचा गाभा आहे. जेव्हा फक्त पाच

स्वरांमध्ये राग मांडायचा असतो तेव्हा इतर स्वरही तिथे असतात, ते दिसत नाहीत एवढंच. या त्यांच्या तरल सूक्ष्म जाणिवा प्रत्यक्ष गाताना सतत काहीना काही नवं घडवत राहिल्या. त्यामुळेच त्या बारकाव्याने दोन स्वरांमध्ये असणाऱ्या श्रृतींचीही दखल घेत राहिल्या. हे तर खूपच मोठं आव्हान आहे. कारण ते गानकलेचा अप्रकट पण अविभाज्य भाग आहे.

किशोरीताईंचं म्हणणं होतं, सूर प्रवाही आहे. अखंड आहे. तर शब्द मात्र तुटलेला असतो. या सूरांच्या जाणकारीचा प्रत्यय म्हणजेच अगदी तीन राग एकत्र गातानाही त्यातून नव्याची प्रचिती येणं. शिवाय कोणताही प्रचलित राग प्रत्येक वेळेस नव्या रूपात आविष्कृत होणं. इथेच संगीत कलेच्या जिवंतपणाचा संबंध सुरू होतो. ही कला श्वास उच्छवासाशी बांधलेली आहे. शरीरातल्या (कंठातल्या) जीवंत असणाऱ्या तंतूमय नाजूक स्नायुंच्या धाग्यापासून छोटुश्या पेशींच्याही अस्तित्वाची दखल घेण्याचा हा प्रवास असतो. ते आविष्कृत होतं आणि लगेच ते संपूनही जातं. हे घडवताना सृजनाचा आविष्कार करणं ही तर फारच मोठी बाब झाली, किशोरीताईंची त्यावर पकड होती म्हणूनच त्या 'गानसरस्वती' होत्या.

हा सृजनशीलतेचा प्रवासही मोठा विलक्षण आहे. केवळ किशोरीताईंच्या बोलण्यातूनच ते स्पष्ट होऊन जातं. म्हणजे हा प्रवास सहजतेतून सजगतेकडे जातो. सजगतेतून पुन्हा अत्यंत मेहनतीतून सहजतेकडे पुन्हा जातो. आणि एकदा ही सहजता आली की सजगता नव्या सृजनाची अपेक्षा करायला लागते. किशोरीताईंची सर्जनशीलता अशी सततच्या धगीसारखी वाटायची. कदाचित त्यांच्या अस्वस्थतेचं मर्म यातच असावं. गानकलेविषयी असणाऱ्या त्यांच्या प्रचंड संवेदनक्षमतेचही तेच रहस्य आहे.

किशोरीताई गानकलेच्या प्रचंड अभिमानी होत्या. तरुण मुलांशी बोलताना याच कार्यक्रमात त्यांनी (नाव न घेता) हिंदी सिनेसृष्टीतल्या एका सुप्रसिद्ध जोडीचा उल्लेख केला. त्या म्हणाल्या, यातील एकजण मला एकदा म्हणाले, 'तुम्ही यमन यमन काय करता, आम्ही यमनमध्ये पाचशे गाणी केली आहेत.' किशोरीताईंनी त्यांना उत्तर दिले, 'तुम्ही पाच हजार गाणी केलीत तरी आमचा यमन संपणार नाही.' ही त्यांची प्रगल्भताच त्यांचं खास वेगळेपण वाटते.

अशा या समृद्ध कलेला लोकप्रियता खरोखरच कमी आहे? आणि असेल तर का? ही कला अभिजनांचीच राहिली. वास्तविक तिचा उगम लोकसंगीतात दडलेला सापडतो. पण लोकसंगीतच लोपून गेलं. सर्वसामान्यांची उसंत संपून गेलेली. ते ही स्वरभाषा कधी जाणून घेणार? आमचं सामाजिक जीवन आगदी शब्दांसारखच कप्पेबंद झालेलं आहे. त्यातलं सुंदर प्रवाहीपण जर संपलेलं असेल तर नवी अभिजात कला तर सोडाच पण आहे त्या अभिजाततेचा तरी आस्वाद कसा मिळणार?

विशिष्ट राग विशिष्ट वेळीच गावा असे त्यांचे मत होते व तसे झाले की निसर्ग साथ करतो असे त्या म्हणाल्या, तेव्हा मात्र माझ्या मनात एक प्रश्न डोकावला, ज्याची त्यांच्याशी चर्चा करावी असे मला फार वाटले होते. ज्या निसर्गाची माणसाने आता अगदी भरपूर वाट लावलेली आहे, त्या निसर्गाच्या कोणत्या साथीची माणसाला अपेक्षा आहे? याचा विचार कसा करायचा, असा प्रश्न माझ्या मनात रेंगाळत राहिला. कधीतरी यावर बोलता येईल अशी मला आशा होती. पण आता ते शक्य नसले तरी गानसरस्वतीच्या पुण्याच्या उत्सवात जाण्याची संधी मला अच्युत गोडबोले यांच्यामुळे मिळाली. एवढंच नाही तर अगदी आत,

खास पाहुण्यांच्या कक्षातही डोकावता आले. तिथे झाकीर हुसेनांपासून अनेक दिग्गज्ज होते. किशोरीताईंचे चिरंजीव विभासही होते. आम्ही त्यांच्याशीच बोलत होतो, आणि ते सांगत होते, की ते पर्यावरणावर विशेष काम करतात. पर्यावरणाचे अभ्यासक डॉ. माधव गाडगीळ यांच्या सायकल रॅल्यांमध्येही त्यांनी विशेष उत्साहाने भाग घेतलेला आहे.

डॉ. माधव गाडगीळ यांच्या माहितीनुसार ज्या गोव्याच्या समृध्द निसर्गाने या महान गायिकेला (आणि मंगेशकर, अभिषेकी इत्यांदींसारख्या) इतरही गायकांना एक समृद्ध वारसा दिला त्या गोव्याचा सगळाच निसर्ग मोठ्या झपाट्यानं उद्ध्वस्त केला जात आहे. म्हणूनच संगीत- निसर्ग आणि माणूस यांचं अतूट सुंदर नातं खरंच समृध्द करायचं असेल तर आजच्या ट्रम्पनीतीच्या काळात, किशोरीताईंच्या सूर भाषेने मंत्रमुग्ध झालेल्या तरुणांनी हा विभासही म्हणजे (विभास आमोणकर) अभ्यासावा असे वाटून गेले. किशोरीताईंचा मुलगा, विभास अमोणकर ज्यानं पर्यावरणाचं वेगळं भान घेतलं आहे!

माणसं एकमेकांशीही माणसांसरखी वागू शकत नाहीयेत तर निसर्गाची काय तमा? त्यांच्या अशाच एका निकटवर्ती व्यक्तीनं मला एकदा सांगितलं की, किशोरी ताईंनी एका डायरीत सुंदर अक्षरात संपूर्ण ज्ञानेश्वरी लिहून काढली होती. 'जो जे वांच्छील तो ते लाहो' हे पसायदान खरच जेव्हा जगात आवतरेल तेव्हा सूर ही विश्वाची भाषा ठरेल. तेव्हाच किशोरीताईंच्या सृजनशीलतेला कृतज्ञतेची खरी सलामी मिळेल.

किशोरीताईंना मनःपूर्वक अभिवादन.

●

संदर्भ

१. दांडेकर विश्वास (प्रस्तावना), स्वरहिंदोळे, ले. मारुलकर, दत्ता, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे

लेखिका कामगार चळवळीमध्ये कार्यरत असून सर्जनशील तसेच समीक्षा लेखक आहेत.

'परिवर्तनाचा वाटसरू'मध्ये प्रसिद्धीसाठी पाठवलेल्या लेखांचे स्वागत आहे.

संपादनाच्या सोयीसाठी प्रकाशनासाठी पाठवलेले लेख सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख युनिकोड अथवा श्रीलिपी ७ च्या श्री-देव७-०७०८ या फाँटमध्ये पाठवावा.

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :**

**वाटसरूचा नवीन पत्ता**

द्वारा **प्रशांत खुंटे**
वॉर्ड क्र. ५/ घ. क्र. ६२, बौद्धविहाराजवळ,
गणेशनगर, येरवडा, पुणे ४११००६
भ्र. ७७७६९०२२६७